# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/02/2024 (सोमवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मधुबन हॉटेल समोर दिनांक १८/०२/२०२४ चे १३.२० वा. ते १४.१० वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने मधुबन हॉटेल जवळ भंडारा ते नागपुर रोडवर बॅरीकेट्स लावुन नाकाबंदी केली असता आरोपी भंडारा कडुन नागपुरकडे येणाऱ्या चालक **आरोपी नामे– १) समीर अण्णाजी तिजारे, वय १९ वर्ष, रा. नेहरू वार्ड, नांदोरा, ता. जि. भंडारा व मालक नामे–२) अश्विन भिमराव चोपकर, वय ३१ वर्ष, रा. नेहरू वार्ड, नांदोरा ता. जि. भंडारा** हे आपले ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. एच.–३६/ए. ए.–०९९७ या वाहनामध्ये चारा पाण्याची व्यवस्था न करता एकुण ०९ म्हशीचे पारडे कोंबून निदर्यतेने वागणुक देवुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. एच.–३६/ए. ए.–०९९७ किंमती ५,००,०००/–रू., ०९ जनावरे किंमती ४५,०००/–रू. असा एकुण ५,४५०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे– सरतर्फे पोलीस हवालदार हरिश यंगलवार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ११(१)(ड), प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६० काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीष यंगलवार, मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत पोंहवा प्रदीप ठाकरे, गणेश मुदमाळी, रूपेश माहादुले यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर